**पाहिजेत**
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**व्यवसाय**
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५५ वा | गुरुवार, दि. २१ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

**बेरोजगारांसाठी सुवर्णसंधी !**
रु. 90,500 गुंतवणूक करा आणि एक संपूर्ण स्वयंचलित मशीन बसवा.
घरीच आकर्षक कागदी ग्लास, प्लेटस, द्रोण, पान बनवायला सुरूवात करा आणि **दररोज रू. 1000/- ते रू. 3000/- कमवा.**
आमच्याकडून कच्चा माल घ्या आणि तयार माल आम्हांला परत करा.
3 वर्षे करारासह
आमचं काम फक्त कच्चा माल पुरवण आणि तयार माल घेणं आहे.
बालाजी पेपर प्रोडक्ट्स:
एस.टी. स्टँड, पुणे रोड, क्रोमा शोरूमच्या समोर, पहिला मजला, सोलापूर
9288624194

# महापालिकेची अवैध बांधकामांवर धडक कारवाई

## ११ गाळ्यांवर बुलडोझर, परिसरात खळबळ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेने शहरातील अवैध बांधकामांविरोधात सुरू केलेली धडक मोहीम दुसऱ्या दिवशीही सुरू ठेवत गुरुवार पेठ आणि शनिवार पेठ परिसरात मोठी कारवाई केली आहे.

पार्किंगसाठी राखीव असलेल्या जागेवर अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या तब्बल ११ गाळ्यांवर महापालिकेच्या पथकाने बुलडोझर चालवत कारवाई केली. या कारवाईमुळे अवैध बांधकामधारकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

ही कारवाई महापालिकेच्या ९६ अवैध बांधकाम प्रकरणांच्या अंतर्गत करण्यात आली. गुरुवार पेठेतील ताहेर बागवान आणि शनिवार पेठेतील खुदाबक्ष बागवान










यांच्या इमारतींमध्ये पार्किंगसाठी राखीव जागेचा व्यावसायिक वापर करून अनधिकृत गाळे उभारण्यात आल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. त्यानंतर कायदेशीर नोटीस प्रक्रिया पूर्ण करून ही कारवाई करण्यात आली.

कारवाई दरम्यान महापालिकेच्या पथकाने सकाळपासूनच यंत्रसामग्रीच्या मदतीने पाडकाम मोहीम राबवली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले, मात्र अखेर ही कारवाई शांततेत पार पडली. या मोहिमेत कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती, उपअभियंता आनंद जोशी, सहाय्यक अभियंते शकील शेख, इर्शाद झरतार, कनिष्ठ अभियंते गणेश काकडे, बसवराज बडगा, सलमान मणियार, दयानंद अवताडे, दिपाली मेटकरी, प्रमोद गोविंदवार तसेच अतिक्रमण विभागाचे दीपक कुंभार उपस्थित होते. तसेच जेलरोड पोलीस ठाण्याचे निरीक्षक राऊत आणि त्यांचे पथकही बंदोबस्तासाठी तैनात होते.

महापालिका प्रशासनाने शहरातील अवैध बांधकामांवर पुढील काळातही कठोर कारवाई सुरूच राहील असा इशारा दिला आहे. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करून उभारलेली बांधकामे करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आयुक्तांनी या इमारतीच्या पाडकामाचे आदेश दिल्यानंतर यातील ३५ जणांनी कारवाई थांबविण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने कारवाईला स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे पालिका आयुक्तांनी १९ ते २३ मे असे सलग पाच दिवस एकूण नऊ इमारतींचे पाडकाम करण्याचे आदेश दिले आहेत.

# सोलापूरमध्ये हजारो औषध विक्रेत्यांचा भव्य मूक मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय औषध विक्रेता संघटना (AIOCD) यांच्या वतीने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री, कॉर्पोरेट कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या अवाजवी डिस्काउंट पद्धती तसेच औषध व्यवसायातील अव्यावसायिक स्पर्धेविरोधात दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी औषध विक्रेता बंद पुकारण्यात आला होता. या बंदला महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




AIOCD चे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी सांगितले की, ऑनलाईन औषध विक्रीबाबत अद्याप कायदेशीर स्पष्टता नसताना देशभरात सर्रास औषध विक्री सुरू असून यामुळे औषध व्यवसाय आणि जनतेच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. तसेच कॉर्पोरेट कंपन्यांकडून २०% ते ५०% पर्यंत दिल्या जाणाऱ्या डिस्काउंटमुळे छोट्या औषध विक्रेत्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. सरकारने Drug Price Control Order (DPCO) 2013 मधील नफा मर्यादेबाबत फेरविचार करावा तसेच औषध विक्रेत्यांना ब्रँड सबस्टिट्यूशनचा अधिकार द्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

राज्य संघटनेचे सचिव अनिल नावंदर यांनी महाराष्ट्रातील बंद १००% यशस्वी झाल्याचे सांगितले. लोकशाही मार्गाने वारंवार निवेदने देऊनही सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे औषध विक्रेत्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या देशव्यापी बंदला पाठिंबा दर्शवत सोलापूर डिस्ट्रिक्ट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या वतीने सोलापूर शहरात भव्य मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो औषध विक्रेते आणि केमिस्ट बांधव या मोर्चामध्ये सहभागी झाले. मोर्चा चार पुतळा येथून सुरू होऊन जिल्हाधिकारी कार्यालय, पुनम गेट येथे समाप्त झाला.

मोर्चादरम्यान ऑनलाईन औषध विक्री, अवाजवी डिस्काउंट पद्धती आणि औषध व्यवसायास बाधा आणणाऱ्या धोरणांविरोधात निषेध व्यक्त करण्यात आला. या आंदोलनाला इंडियन मेडिकल असोसिएशन, सोलापूर हॉस्पिटल ओनर्स असोसिएशन, MSMRA तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दर्शविला.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष व्यंकटेश पुजारी, जिल्हा सचिव राजेश वीरपे, बसवराज मनोरे, जिल्हा सहसचिव सिद्धेश्वर काळे, मनीष बलदवा, शहराध्यक्ष विलास कारभारी, शहर उपाध्यक्ष श्याम बाहेती, शहर सहसचिव चैतन्य शेळके, शहर खजिनदार हमीद हल्ल्याळ, जिल्हा संघटक सचिव प्रताप कांचन, अनंत चिटकुल, कय्युम इनामदार, राजशेखर बारोळे, राम जोडमोटे, IMA अध्यक्ष डॉ. मंठाळे, हॉस्पिटल असोसिएशन अध्यक्ष डॉ. मस्के तसेच मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह प्रतिनिधी अजित महामुनी उपस्थित होते.

उपस्थित पदाधिकाऱ्यांनी औषध विक्रेत्यांच्या विविध समस्यांवर प्रकाश टाकत सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला.

# लॅब टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनतर्फे रविवारी डॉ. दीक्षित यांचे व्याख्यान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील लॅब टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन या संघटनेच्या वतीने दीक्षित जीवनशैलीच्या माध्यमातून मधुमेह मुक्ती व वजन नियंत्रण याबाबत विशेष व्याख्यान रविवार, दि.24 मे रोजी मधुमेहतज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचे आयोजित केले आहे, अशी माहिती अध्यक्ष स्वप्निल पोतदार यांनी पत्रकार



परिषदेत दिली. रविवारी सायंकाळी पाच वाजता येथील शिवछत्रपती रंगभवन या हॉलमध्ये या व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. प्रत्येक घरामध्ये एक नाही तर दोन शुगरचे पेशंट हे असतातच. आताच्या फास्टफूडमुळे लहान वयातच वजन खूप वाढते. कुठल्याही प्रकारच्या गोळ्या औषध न घेता याला नियंत्रण कसे करावे व आपले दैनंदिन दिनचर्या कशी असावी याबाबत या व्याख्यानातून डॉ. जगन्नाथ दीक्षित हे आपल्याला मार्गदर्शन करणार आहेत. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असून सोलापूरवासीयांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष शिवकुमार आहेरवाडीकर, सचिव राहुल जाधव आदी उपस्थित होते.

# सर्व राजकीय पक्ष व शासकीय यंत्रणांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे- जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाने दिनांक 18 मे 2026 रोजी महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्याच अनुषंगाने त्या दिवसापासून सोलापूर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. ही आचारसंहिता लोकसभा व विधानसभा निवडणूक प्रमाणे असणार आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्ष तसेच शासकीय यंत्रणांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित राजकीय पक्ष प्रतिनिधी तसेच शासकीय यंत्रणाच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील,



उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, जिल्हा प्रशासन अधिकारी योगेश डोके तसेच विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन म्हणाले की, निवडणूक अधिसूचना प्रसिद्धी 25 मे 2026, नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख 1 जून, नामनिर्देशन छाननी 2 जून, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख 4 जून, मतदान दिनांक 18 जून 2026 (गुरुवार) सकाळी 8 ते दुपारी 4

तर मतमोजणी 22 जून रोजी होणार असून निवडणूक पूर्ण होण्याची अंतिम तारीख 25 जून 2026 आहे.

या निवडणुकीत एकूण 19 स्थानिक संस्था सहभागी होत असून, त्यात जिल्हा परिषद, सोलापूर महापालिका तसेच 17 नगरपरिषद व नगरपंचायतांचा समावेश आहे. एकूण मतदारसंख्या 616 असून, त्यात 544 सामान्य मतदार, 49 नामनिर्देशित व 23 अध्यक्षीय(पंचायत समिती सभापती, नगराध्यक्ष) मतदारांचा समावेश आहे. नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील कलेक्टर चेंबर निश्चित करण्यात आले आहे. अर्ज दाखल करण्याची वेळ सकाळी 11 ते दुपारी 3 अशी राहणार असून, अर्ज शुल्क 100 रुपये आहे. खुल्या गटासाठी ठेव रक्कम 10 हजार तर अनुसूचित जाती-जमातीसाठी 5 हजार रुपये आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिली.

मतदानासाठी एकूण 6 मतदान केंद्रे प्रस्तावित असून ती उपविभागीय अधिकारी स्तरावर उभारण्यात येणार आहेत. मतमोजणीचे केंद्र नियोजन भवन, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे राहील. आज सायंकाळपर्यंत मतदार यादी फायनल करून सर्व राजकीय पक्ष यांना देण्यात येतील तसेच तहसील कार्यालय गटविकास अधिकारी कार्यालय उपविभागीय अधिकारी कार्यालय दर्शनी भागात ठेवण्यात येतील. ही निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असल्याचेही कार्तिकेयन यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदभार्तील अधिकृत कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. निवडणुकीदरम्यान आचारसंहिता 18 मे ते 25 जून 2026 या कालावधीत लागू राहणार असून, निधीवाटप, धोरणात्मक निर्णय, प्रचार साहित्य, पोस्टर-बॅनर यावर निर्बंध असतील. तसेच प्रत्येक तालुक्यात ऋळ, रऱळ व शळ अशा तीन स्वतंत्र पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी या निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी असतील तर निवासी उपजिल्हाधिकारी हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी असतील, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे यांनी दिली.

# भारतातील पहिला डीएमई उत्पादन प्रकल्प बालाजी अमाईन्सकडून कार्यान्वित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बालाजी अमाईन्सने चिंचोळी एमआयडीसी, सोलापूर येथील आपल्या युनिट-४ प्रकल्पामध्ये डायमिथाईल इथर (DME) उत्पादन प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित केला असून दिनांक २० मे २०२६ पासून व्यावसायिक उत्पादनास प्रारंभ करण्यात आला आहे. या यशामुळे व्यावसायिक स्तरावर डीएमईचे उत्पादन करणारी बालाजी अमाईन्स ही भारतातील एकमेव कंपनी ठरली आहे.

डीएमई हे एलपीजीमध्ये मिश्रण करून वापरता येणारे स्वच्छ व कार्यक्षम पर्यायी इंधन मानले जाते. अनेक पाश्चिमात्य व युरोपीय देशांमध्ये एलपीजीमध्ये २० टक्क्यांपर्यंत डीएमईचे मिश्रण करून त्याचा वापर केला जातो. कंपनीने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित दरवर्षी १,००,००० मेट्रिक टन उत्पादन क्षमतेचा हा प्रकल्प उभारला असून डीएमईसाठी आवश्यक मूलभूत अभियांत्रिकी तंत्रज्ञान परदेशी कंपनीकडून प्राप्त करण्यात आले आहे.

यावेळी बोलताना व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांनी सांगितले की, हा प्रकल्प



भारताच्या ऊर्जा आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. भारतासाठी डीएमई उत्पादन पूर्णपणे नवीन असल्याने बीआयएसने (BIS) नुकताच नवीन आयएस कोड प्रसिद्ध केला असून त्यानुसार एलपीजीमध्ये ८ टक्क्यांपर्यंत डीएमई मिश्रण करू शकतो. सार्वजनिक क्षेत्रातील ऑइल मार्केटिंग कंपन्यांनी (OMCs) आता डीएमई मिश्रण उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

जागतिक ऊर्जा क्षेत्रातील वाढती अनिश्चितता लक्षात घेता पर्यायी इंधनांचा विकास ही काळाची गरज बनली असल्याचे त्यांनी सांगितले. डीएमईच्या वापरामुळे भारताची एलपीजी आयातीवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होऊन परकीय चलनाची बचत होण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारतामधील हा पहिलाच डीएमई उत्पादन प्रकल्प असल्यामुळे उत्पादन साठवण, हाताळणी, वापर, वाहतूक तसेच रोड टँकरद्वारे परिवहन यासंदभार्तील पुरेशा भारतीय मानकांच्या अभावामुळे ढएरड परवानग्या व इतर वैधानिक मंजुरी मिळविताना कंपनीला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आंतरराष्ट्रीय मानकांचा संदर्भ घेऊन त्यांचे परीक्षण व पडताळणी करत आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची प्रक्रिया वेळखाऊ ठरल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी बालाजी अमाईन्स एरोसोल उद्योग तसेच इतर व्यावसायिक क्षेत्रांमध्ये हीटिंगसाठी इंधन म्हणून डीएमईचा पुरवठा करणार आहे.

या प्रकल्पाच्या उद्घाटन समारंभास पूर्णवेळ संचालक एन. राजेश्वर रेड्डी, वरिष्ठ महाव्यवस्थापक श्री. गोविंद मेंचेकरे तसेच महाव्यवस्थापक श्री. विनय दुर्गम उपस्थित होते.

यावेळी डी. राम रेड्डी यांनी कंपनीच्या भविष्यातील धोरणाबाबत माहिती देताना सांगितले की, बालाजी अमाईन्स भारतातील ईव्ही बॅटरी केमिकल्स क्षेत्रात अग्रगण्य भूमिका बजावण्यासाठी वेगाने विस्तार करत आहे. ईव्ही बॅटरी क्षेत्रातील वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी कंपनीने लक्ष केंद्रित केले असून भविष्यात विद्यमान काही प्रकल्पांचे पुनर्रचना करून नव्या पिढीतील ईव्ही बॅटरी केमिकल्स उत्पादनासाठी त्यांचा वापर केला जाणार आहे.

**डायमिथाईल कार्बोनेट (DMC) - इलेक्ट्रॉनिक ग्रेड :**

डीएमसीचा वापर ईव्ही बॅटरी इलेक्ट्रोलाइट्समध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. भारतात या रसायनाचे उत्पादन करणारी बालाजी अमाईन्स ही एकमेव कंपनी असून कंपनीकडे सध्या वार्षिक १५,००० मे. टन उत्पादन क्षमता उपलब्ध आहे. अत्यल्प अतिरिक्त खर्चात ही क्षमता वाढविण्याची क्षमता कंपनीकडे आहे.

**एन-मिथाईल पायरोलिडोन (NMP) - इलेक्ट्रॉनिक ग्रेड :**

एनएमपीचे उत्पादन बालाजी अमाईन्स गेल्या दोन दशकांपासून करत असून आता कंपनीने ईव्ही बॅटरी ग्रेड सॉल्व्हेंट विकसित केले आहेत. देशभर उभारल्या जाणाऱ्या गिगा वॅट क्षमतेच्या ईव्ही बॅटरी प्रकल्पांना पुरवठा करण्यासाठी कंपनी सज्ज झाली आहे.

डीएमसी व एनएमपी या दोन्ही रसायनांचे उत्पादन करणारी बालाजी अमाईन्स ही भारतातील एकमेव कंपनी आहे. या सर्व घडामोडींमुळे विशेष रसायन क्षेत्रातील विविध विभागांमध्ये कंपनी अग्रस्थानी असल्याचे व्यवस्थापनाने स्पष्ट केले.

# मध्यरात्री घरफोडी करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** न्यू बुधवार पेठ परिसरात एकाच रात्री घडलेल्या दोन घरफोडीच्या गंभीर गुन्ह्यांचा शहर गुन्हे शाखेने अत्यंत कमी वेळात छडा लावत आंतरजिल्हा सराईत टोळीला अटक केली आहे. या कारवाईत रोख रक्कम, सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली कार असा तब्बल ४ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. ४ मे २०२६ रोजी रात्री ९ ते दि. ५ मे रोजी सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान फकीरा चौक, न्यू बुधवार पेठ येथील दोन बंद घरांचे कडी-कोयंडे उचकटून आणि कुलूप तोडून चोरी करण्यात आली होती. चोरट्यांनी घरातील कपाटात ठेवलेली १७ हजार ५०० रुपयांची रोकड तसेच लहान मुलाच्या कानातील सोन्याच्या बाळ्या असा एकूण ४७ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला होता.

या प्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात घरफोडीचे दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते. घटनेचे गांभीर्य ओळखून शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर, जे. व्ही. गळवे आणि त्यांच्या पथकाने तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी पुणे येथे सापळा रचून चार आरोपींना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :

- दिपक बाळू ढेरंगे (रा. कोरेगाव भीमा, पुणे)
- दत्ता अरुण कदम (रा. नऱ्हे, पुणे)
- आकाश सूर्यकांत आंग्रे (रा. बिबवेवाडी, पुणे)
- साहेबराव लक्ष्मण बेंडूरे (रा. मुंबई)

## संपादकीय

# पेपरफुटीचा खेळ

३ मे रोजी झालेली यूजी 'नीट' ही राष्ट्रीय वैद्यकीय सामायिक परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)ने रद्द झाल्याचे ठरवून परत नव्याने परीक्षा घेणार असल्याचे जाहीर केल्यामुळे देशभरातील लाखो विद्यार्थी अनिश्चितता आणि निराशेच्या गर्तेत सापडले आहेत. अनेक राज्यांत ६०० मार्कांचे १४० प्रश्न हे परीक्षेच्या तीन आठवडे आधीच १० लाख रुपये प्रतिपेपर दराने विकले गेल्याचे उघडकीस आल्यावर हा निर्णय घेण्यात आला. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे 'नीट' परीक्षा घोटाळा हा तिसऱ्यांदा उघडकीला आलेला आहे. वैद्यकीय प्रवेशासारख्या सर्वसामान्यांच्या जगण्या-मरण्याशी संबंधित असलेल्या परीक्षेबाबतची पारदर्शकता टिकवता न येणे हे केवळ अपयश नव्हे तर लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्य व भावनांशी खेळण्याचा तो अक्षम्य गुन्हा आहे.

एमबीबीएस प्रवेशाच्या जागा आहेत १ लाख २९ हजार ६०३. त्यासाठी दरवर्षी परीक्षेला बसतात साधारण २२ ते २५ लाख विद्यार्थी. केवळ एमबीबीएस नव्हे तर बीडीएस, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्धा, नर्सिंग, फिजिओथेरपी अशा सर्व वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 'नीट' ही एकच सामायिक प्रवेश परीक्षा देशभर घेतली जाते. या पैकी अनेक विद्यार्थी या परीक्षेची तयारी पाच-पाच वर्षेही करत असतात. 'नीट' सोबतच पदव्युत्तर प्रवेश परीक्षा व परदेशातील वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'एफएमसीईजी' या परीक्षांवरही वेळोवेळी प्रश्नचिन्हं उपस्थित झाली आहेत. तीन वर्षे उघडीस आलेल्या या घोटाळ्यांमुळे आता होणार असलेल्या फेरपरीक्षेवरही विश्वास कसा ठेवायचा असा प्रश्न विद्यार्थी आणि पालकांना पडला आहे.

या परीक्षेची पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी सध्याच्या व्यवस्थेत सुधारणा करणे हा केवळ तात्पुरता बदल ठरेल. ही परीक्षा पूर्णतः संगणकाधारित करणे हाच दूरगामी आणि कायमचा उपाय आहे. 'नीट' परीक्षेत छापील प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका या ओएमआर (ऑप्टिकल मार्क रिकग्निशन) शीटच्या स्वरूपात असून त्यावर पेनाने खुणा करून उत्तरे द्यावी लागतात. या पद्धतीतच घोटाळ्याची अनेक बीजे आहेत. यावर्षी प्रश्नपत्रिका छपाईचे काम जयपूर येथील एका खासगी एजन्सीला देण्यात आले होते. तिथूनच ती फुटल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. भारत सरकारचा मुद्रण व लेखन सामग्री संचलनालय हा छपाईची अवाढव्य यंत्रणा असलेला विभाग अस्तित्वात आहे. मग 'नीट' सारख्या अत्यंत संवेदनशील परीक्षेच्या प्रश्न पत्रिकेच्या छपाईचे काम बाहेर का दिले जाते, असा प्रश्न पडतो. मूळ प्रश्न पत्रिकेचे सेट हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत ठेवले जातात आणि पेपर फुटला तर पर्यायी प्रश्न पत्रिकेचे सेट हे कॅनरा बँकेच्या शाखेत ठेवले जातात. खरे तर ही माहिती अत्यंत गोपनीय असायला हवी, पण वर्षानुवर्षे या गोष्टी जगजाहीर आहेत.

'नीट' परीक्षा घेण्याचा खर्च हा २०० कोटी रुपये आहे व 'एनटीए'कडे अर्ज भरताना विद्यार्थ्यांकडून जमा होणारे एकूण शुल्क ३०० कोटी रुपये असते. 'नीट' परीक्षा सुरू झाल्यापासून आजवर 'एनटीए'कडे ३,५१३ कोटी रुपये शुल्क म्हणून जमा झाले आहेत व ३,०६५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. नफा म्हणून कामावलेले ४४८ कोटी रुपये हे आता 'नीट'ची प्रक्रिया सुधारण्यासाठी वापरणे अपेक्षित आहे. खरे तर ही परीक्षा म्हणजे पैसे कमावण्याचे साधन नाही. शासनाने पदरचे पैसे खर्च करून ती अधिक पारदर्शक करावी इतकी ही महत्त्वाची परीक्षा आहे. आता फेरपरीक्षेसाठी पुन्हा २०० कोटी रुपये खर्च येणारच आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला जिल्हा केंद्रावर जाऊन परीक्षा देण्यासाठी पुन्हा खर्च करावा लागेल, त्याचा एकत्रित विचार केला तर तो आकडा ३०० कोटी रुपये होतो. सर्वसामान्यांच्या पैशाचा हा एक प्रकारे अपव्ययच आहे.

या परीक्षेत पारदर्शकता आणण्याची पहिली पायरी म्हणजे या परीक्षा पूर्णपणे जेईई व कॅटप्रमाणे संगणकीय पद्धतीने व्हायला हव्यात. परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांची ओळख ही फेस रेकग्निशन म्हणजे चेहरा व आधार कार्डमध्ये दिलेला आयरिस म्हणजे डोळ्यांचा पडदा स्कॅन करून पटवून घेणे सहज शक्य आहे. परीक्षेतून दरवर्षी १०० कोटी कमावणाऱ्या एनटीएला खर्चाचे कारण सांगून आणि ही यंत्रणा उभी करणे अवघड असल्याची सबब पुढे करून पळ काढता येणार नाही. खरे तर ही परीक्षा सगळीकडे एकाच दिवशी घेण्याचीही गरज नाही. इतर परीक्षांप्रमाणे ती टप्प्याटप्याने घेतली जाऊ शकते. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून हॅकिंगसारखे गैरप्रकार टाळणे सहज शक्य आहे. आयटी कंपन्यांना या परीक्षेचे काम दिले जाते. काही गैरप्रकार घडल्यास त्यांना जबाबदार धरून दंडाची तरतूद करणेही आवश्यक आहे. पेपर फुटणे हा गैरप्रकाराचा केवळ एकच मार्ग झाला. तो उघड झाला म्हणून कळला. अजून असे अनेक मार्ग निश्चितच असतील, जे अद्याप कुणालाच माहीत झालेले नाहीत. २०२४ साली राजस्थानमध्ये चुकीचा पेपर वाटला गेला. दुसरा पेपर देण्यास उशीर लागला म्हणून विद्यार्थ्यांना चक्क ग्रेस मार्क्स देऊन टाकण्यात आले होते. इतक्या तीव्र स्पर्धेच्या व महत्त्वाच्या परीक्षेत असा प्रशासकीय गोंधळ होणे हा सर्वसामान्यांच्या जीवाशी आणि जीवनाशीही खेळ आहे. या परीक्षेतून डॉक्टर म्हणून थेट लोकांच्या जीवाचा ताबा आपण या विद्यार्थ्यांना देत असतो. यातले गांभीर्य केंद्र सरकारने लक्षात घेणे गरजेचे आहे.

कुठलीही वेळेची मर्यादा न पाळता चालणारी दीर्घ प्रवेश प्रक्रिया हा या परीक्षेचा आणखी एक मोठा दोष आहे. विद्यार्थी व पालकांच्या मानसिक छळाचे तेही एक कारण आहे. 'नीट'ची परीक्षा होते मे महिन्याच्या पहिल्या रविवारी, मात्र प्रवेश प्रक्रिया संपण्यासाठी फेब्रुवारी महिना उजाडतो. ही प्रक्रिया पूर्णपणे संगणकीकृत असूनही ती पूर्ण होण्यास १० महिने का लागावे? फार तर एका महिन्यात ती संपायला हवी. चांगल्या बुद्धिमत्तेची १८ ते २० वयोगटातील लाखो मुलांची एक पूर्ण पिढी १० महिने घरी रिकामी बसवून आपण किती मानवी क्रयशक्ती वाया घालवतो? याचे कारण असे की नव्या वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी देण्यासाठी कुठलीही तारखेची मर्यादा केंद्र व राज्य सरकार पाळत नाही. प्रवेश परीक्षा असो की प्रवेश प्रक्रिया यातील गोंधळाच्या मुळांचा शोध घेतला तर अशा अनेक गोष्टी लक्षात येतील.

केंद्र शासन वैद्यकीय प्रवेशाच्या जागा वाढवण्यास उत्सुक आहे. त्यात काही गैर नाही, पण या जागा वाढवताना त्या भरण्यासाठीचा पाया असलेली प्रवेश परीक्षा ही भक्कम व पारदर्शक करणे ही पहिली गरज आहे. अन्यथा केवळ संख्यात्मक वाढ करून अनागोंदी वाढीस लागेल. पेपरफुटी सारखी प्रकरणे ही सर्व सामान्यांच्या स्वप्नांशी केलेला अमानुष खेळ आहे ही जाणीव ठेवून 'नीट'चे पारदर्शक नियोजन आवश्यक आहे.

### खासगी कोचिंग क्लासची लिंक

'नीट' परीक्षेतील पेपर फुटी आणि अन्य गैर प्रकारांचा संबंध हा खाजगी कोचिंग क्लासेसशी आहे. 'लातूर', 'कोटा' यांच्या धर्तीवर अनेक ठिकाणी मोठी कोचिंग इंडस्ट्री उभी राहिली आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमात हमखास प्रवेशाची खात्री देत या क्लासेसमध्ये लाखो रुपयांचे शुल्क भरून प्रवेश घेतला जातो. या इंडस्ट्रीत आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी व क्लासमधील अधिकाधिक मुलांना वैद्यकीय प्रवेश मिळावा यासाठी कोचिंग क्लासेसमध्ये प्रचंड स्पर्धा असते. त्यातून अशा गैरप्रकारांचा आधार घेतला जातो. या क्लासेसचे नीट परीक्षा यंत्रणेशी असलेले संबंध आता या तिसऱ्या पेपरफुटीच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत. ही भ्रष्ट 'छिद्रे' बुजवायची असतील तर परीक्षेशी सबंधित प्रक्रियेतील पारदर्शकतेची पातळी राखणे हेच उत्तर आहे. पेपरफुटीच्या आधीच्या प्रकरणांतील आरोपींवर काय कारवाई झाली, याचे उत्तरही सरकारला संतापलेल्या विद्यार्थी आणि पालकांना द्यावे लागणार आहे. एनटीए घेत असलेल्या चौदा पैकी पाच परीक्षांमध्ये आतापर्यंत गैरप्रकार आढळून आले आहेत. यावरून एनटीए प्रशासनामध्येच त्रुटी आहेत, हे स्पष्ट होते. पेपरफुटीचे खापर दुसऱ्यावर फोडण्यापेक्षा एनटीएला स्वतःमध्येच सुधारणा कराव्या लागणार आहेत. गैरमार्गाचा अवलंब कसा केला जातो, याची चाचपणी करण्यासाठी केंद्र सरकारने एक थर्ड पार्टी अंडर कव्हर इंटेलिजन्स स्लीपर सेल स्थापन करण्याची गरज आहे. या परीक्षेविषयीची विश्वासार्हता आता रसातळाला गेली आहे, त्यामुळे जे विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करून यश मिळवतात, त्यांच्या यशावरही प्रश्नचिन्ह उभे राहत आहे आणि तसे होणे हे अन्यायकारक आहे.

# विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी खेळ

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी संयुक्त प्रवेश परीक्षा (नीट युजिसी) रद्द करण्यात आल्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने (एनटीए) मंगळवारी जाहीर केला. ३ मे रोजी घेण्यात आलेल्या नीट प्रवेश परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने घेतला आहे. तीन मे रोजी झालेल्या या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील तब्बल १२० प्रश्न हे परीक्षेच्या पंधरा दिवसांपूर्वी अंदाज म्हणून वर्तविण्यात आलेल्या प्रश्नसंचिकेतील असल्याचे निदर्शनास आल्या नंतर राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने हा निर्णय घेतला. एकाच प्रश्नसंचिकेतील १२० प्रश्न जसेच्या तसे नीटच्या परीक्षेत येणे ही पेपर फुटीच आहे. नीट सारख्या महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षेचा पेपर अशा पद्धतीने फुटणे ही जितकी धक्कादायक बाब आहे तितकीच ती चिंतनीयही आहे. ही परीक्षा रद्द झाल्याने अंदाजे दहा लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. गेली दोन वर्ष रात्रीचा दिवस करून परीक्षा देणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना या निर्णयाचा मोठा फटका बसणार आहे. भ्रष्ट व्यवस्था आणि काही लोकांनी केलेल्या चुकीची शिक्षा लाखो गुणी आणि मेहनती विद्यार्थ्यांना मिळणार आहे काहीही चूक नसताना या विद्यार्थ्यांना याचा मनस्ताप सहन करावा लागत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कठीण आर्थिक आणि मानसिक परिस्थितीतून नीटच्या परीक्षेची तयारी केली होती. परीक्षा चांगली गेल्याने चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळेल या आशेवर असणाऱ्या विद्यार्थ्यांवर याचा मोठा मानसिक ताण येणार आहे. खेडेगावातून शहरात आलेल्या विद्यार्थ्यांना आता आणखी आर्थिक झळ सोसावी लागणार आहे. त्यांना पुन्हा शहरात जाऊन राहणे, वसतीगृहाचा खर्च करणे, क्लासेस, टेस्ट सिरिज जॉइन करणे यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे त्यामुळे विद्यार्थीच नाही तर पालकही चिंतेत आहे. दोन वर्षाची मेहनत सफल झाली असे वाटत असतानाच पुन्हा परीक्षा देण्याची वेळ आल्याने विद्यार्थ्यांवर मानसिक तणाव आला आहे. वारंवार पेपर फुटीच्या घटना घडत असतील तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या विश्वासाने परीक्षेची तयारी करावी? ही केवळ परीक्षा व्यवस्थेची चूक नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी केलेला खेळ आहे. अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होण्याची भीती निर्माण झाली आहे. यापुढे तरी पेपर फुटी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाची स्थापना करताना विद्यार्थ्यांची सोय, गुणवत्ता आणि पारदर्शीपणा हे मुद्दे अधोरेखित करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात गेल्या पाच वर्षात तीन वेळा नीटचा पेपर फुटल्याचे समोर आले आहे. २०२४ सालीही नीट परीक्षेचा पेपर फुटला होता. तेंव्हा नीटचा पेपर वीस ते चाळीस लाखांना विकला गेल्याचे समोर आले होते त्यामुळे घोषित केलेला निकाल बदलण्याची नामुष्की राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणावर आली होती. त्यानंतर राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने नीटची परीक्षा सुरक्षित करण्यासाठीच्या उपाययोजना करणे आवश्यक होते. मात्र तसे झालेले नाही हे यंदाच्या प्रकरणावरून दिसून येते. नीट परीक्षेत पेपर फुटू नये यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना गरजेच्या आहेत.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# मराठी आणि तेलुगू संस्कृतीला जोडणारा 'मराठीतून तेलुगू शिका' उपक्रम सोलापुरात यशस्वी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भाषेच्या भिंती ओलांडून दोन संस्कृतींना एकत्र आणण्याच्या उद्देशाने पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि हृदय स्पर्श बहुउद्देशीय समाजसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठीतून शिका तेलुगू लिहायला आणि वाचायला' या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचा सांगता व प्रमाणपत्र वाटप सोहळा रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे उपाध्यक्ष देविदास गोटीपामूल, प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. माणिक अंबाजी गुर्रम, तर विशेष अतिथी म्हणून 'आधुनिक सारथी'चे संपादक श्रीनिवास बुरा तसेच वाचनालयाचे संचालक अशोक इंदापुरे आणि अरविंद चिन्नी यांची उपस्थिती होती.

डॉ. माणिक गुर्रम यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, "सोलापूर हे बहुभाषिक शहर असून अशा उपक्रमांमुळे समाजा-समाजातील संवाद वाढतो. भाषेचे ज्ञान हे केवळ संवादासाठी नाही, तर मनांना जोडण्यासाठी आवश्यक आहे." श्रीनिवास बुरा यांनी बदलत्या काळात दोन भाषांचे ज्ञान असणे हे प्रगतीसाठी कसे महत्त्वाचे आहे, यावर प्रकाश टाकला. अशोक इंदापुरे यांनी दोन्ही संस्थांच्या वतीने घेतलेल्या परिश्रमाची माहिती दिली. ते म्हणाले की, "वाचनालय आणि हृदय स्पर्श संस्थेने घेतलेल्या मेहनतीमुळेच हा उपक्रम यशस्वी झाला असून, सोलापूरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक ऐक्यासाठी हा एक मैलाचा दगड ठरेल."

या उपक्रमाचे मुख्य प्रशिक्षक काशिनाथ गंजी (सचिव, हृदय स्पर्श संस्था) यांनी चित्रपट दिग्दर्शनाच्या शैलीतून विद्यार्थ्यांना अत्यंत रंजक पद्धतीने तेलुगू भाषेची ओळख करून दिली. तर सहाय्यक शिक्षक आणि डाक विभागाचे कर्मचारी श्रीरंग रेगोटी यांनी तयार केलेल्या सोप्या 'स्टडी नोट्स' आणि व्हॉट्सॲपच्या माध्यमातून घेतलेला नियमित होमवर्क यामुळे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना तेलुगू भाषा आत्मसात करणे सहज शक्य झाले.

या सोहळ्यात प्रशिक्षणार्थींच्या वतीने मनोगत व्यक्त करताना गोपीकृष्ण वड्डेपल्लीआणि बाबुराव म्हेत्रे यांनी म्हणाले की, प्रशिक्षक काशिनाथ गंजी आणि श्रीरंग रेगोटी सरांनी वर्गात शिकवताना जे बारकावे सांगितले, त्यामुळे तेलुगू सारखी समृद्ध भाषा शिकणे खूप सोपे झाले. विशेषतः अवघड जोडाक्षरे आणि उच्चार शास्त्र त्यांनी ज्या पद्धतीने समजावून सांगितले, ते कौतुकास्पद आहे. नोकरी-व्यवसाय सांभाळूनही केवळ या सुटसुटीत नियोजनामुळेच आम्हाला ही भाषा आत्मसात करता आली." महिला प्रशिक्षणार्थी सौ. सुजाता चिप्पा आणि सौ. अंजली शिरसी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "रेगोटी सरांनी बनवलेल्या सुटसुटीत नोट्स आणि नियमित डिजिटल होमवर्कमुळे घरबसल्या सराव करणे सोपे झाले. यामुळे आमचा दुसरी भाषा शिकण्याचा आत्मविश्वास वाढला आहे." तसेच अनेक प्रशिक्षणार्थींनी आपले मनोगत व्यक्त करताना, अवघ्या काही दिवसांत आम्हाला तेलुगू लिहिता आणि वाचता येऊ लागल्याचा आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. गौरीशंकर दिकोंडा यांनी सर्वांचे आभार मानले. डॉ. अंजली शिरसी यांच्या वंदे मातरम गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचे कार्यकारी मंडळ आणि हृदय स्पर्श संस्थेच्या अध्यक्षा सौ नर्मदा गंजी, श्रीनिवास वंगारी, उमेश नक्का, सिद्धलिंगेश्वर विजापूरे, हरिदास पेंटा, सौ रमा इप्पनपल्ली यांनी परिश्रम घेतले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे सोलापूरच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातून मोठे कौतुक होत आहे.

# विडी कामगारांना किमान वेतन मिळणार

## सिटूची आक्रमक मागणी



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** विडी कामगारांना महाराष्ट्र राज्य सरकारने जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार फरकासह किमान वेतनाची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी आग्रही मागणी कॉ. नरसय्या आडम यांनी २०१४ सालापासून सातत्याने केली आहे. या प्रश्नावर कामगार संघटना, कारखानदार आणि शासन यांच्यात अनेक बैठका झाल्या; मात्र अद्यापही प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. परिणामी, हजारो विडी कामगार आजही किमान वेतनापासून वंचित असून त्यांच्यावर आर्थिक पिळवणूक आणि अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

सदर बैठक मुंबई येथील महाराष्ट्र राज्य कामगार आयुक्तालय येथे पार पडली. बैठकीत विडी कामगारांना शासन निर्णयानुसार किमान वेतन, फरकाची थकबाकी, कारखान्यात रोख मजुरी आणि किमान ₹१० हजार मासिक पेन्शन देण्याची मागणी जोरदारपणे मांडण्यात आली. या रास्त मागण्यांना इतर कामगार संघटनांनीही पाठिंबा दर्शविला.

यावेळी बोलताना कॉ. नरसय्या आडम म्हणाले की, 'पूर्वी विडी उद्योगावर २८ टक्के जीएसटी होता, तो आता १८ टक्क्यांवर आला आहे. तंबाखूवरील जीएसटीही ५ टक्के करण्यात आला आहे. याशिवाय, पूर्वीपासून दर हजार विड्यांमागे ५ टक्के सेस जमा केला जातो. इतक्या सुविधा उपलब्ध असतानाही विडी कामगारांना किमान वेतन दिले जात नाही, ही अत्यंत संतापजनक बाब आहे.'

दुसरीकडे, मालक संघटनेच्या प्रतिनिधींनी इतर राज्यांमध्ये अत्यल्प मजुरी दिली जाते, कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ झाली आहे आणि व्यवसाय चालविणे अत्यंत कठीण बनले असल्याचे सांगितले. वाढत्या उत्पादन खर्चामुळे शासनाने वास्तव परिस्थिती लक्षात घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

यावर राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात कमी मजुरी दिली जाते. भविष्यात केंद्र सरकारने किमान वेतनात वाढ केल्यास ती वाढही कामगारांना देणे बंधनकारक राहील.'

तसेच, विडी कामगारांना किमान ₹१० हजार मासिक पेन्शन मिळावी या मागणीसंदर्भात कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लेखी पत्र पाठवून प्रत्यक्ष भेट घेऊन सकारात्मक निर्णयासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीस कामगार संघटनांच्या वतीने ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम, सीटू चे राज्य महासचिव एम. एच. शेख (सर), युसुफ शेख (मेजर), नसीमाताई शेख, विल्यम ससाणे, दीपक निकंबे, वसंत पवार, विष्णु कारमपुरी (महाराज), गोवर्धन संचू, सायबण्णा तेग्गेळी, सविता यरझल गिता चिलवेरी शामला बिनगुंडी,आदी उपस्थित होते. तर मालक संघाच्या वतीने माजी आमदार कैलास गोरंट्याल, ॲड. विजय मराठे, मालक संघाचे अध्यक्ष सुनील छत्रिय, नितीन साबळे, बाळासाहेब जगदाळे आदींचा समावेश होता.

कामगार संघटनांनी यावेळी स्पष्ट केले की, 'किमान वेतन कायदा, वेतन संहिता २०१९, सामाजिक सुरक्षा संहिता २०२० आणि कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसंबंधी विविध कायद्यांनुसार विडी कामगारांना न्याय मिळणे आवश्यक आहे. शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून किमान वेतनाची अंमलबजावणी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.'

# 'एस के बनाना'वर शेतकऱ्यांचे कोट्यवधी अडकल्याचा आरोप

## कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा - संजय (बाबा) कोकाटे

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी एमआयडीसीमधील श्री कृष्णा इम्पेक्स वेंचुरेस लिमिटेड अर्थात 'एस के बनाना' या कंपनीवर केळी उत्पादक शेतकऱ्यांचे आणि स्थानिक वेंडरांचे कोट्यवधी रुपये थकवल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीत ढकलणाऱ्या या प्रकरणाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना नेते संजय (बाबा) कोकाटे यांनी केली आहे.

टेंभुर्णी-कुर्डूवाडी रोडवरील एमआयडीसी परिसरात कार्यरत असलेली ही कंपनी परिसरातील केळी उत्पादक शेतकऱ्यांकडून वेंडरमार्फत उधारीवर केळी खरेदी करून परदेशात निर्यात करत असल्याची माहिती समोर आली आहे. टेंभुर्णी, माढा, करमाळा, माळशिरस आणि इंदापूर या भागातील अनेक शेतकरी या व्यवहाराशी जोडले गेले आहेत. मात्र आता या संपूर्ण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, कंपनीच्या व्यवहारपद्धतीवर गंभीर शंका व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक सुशिक्षित बेरोजगार तरुणांना वेंडर म्हणून जोडले जाते. शेतातून केळी काढणे, त्याचे बॉक्स पॅकिंग करणे आणि कंपनीपर्यंत पुरवठा करण्याची जबाबदारी या वेंडरांवर सोपवली जाते. मात्र धक्कादायक बाब म्हणजे कंपनी आणि वेंडर यांच्यात कोणताही लेखी करार नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण व्यवहार विश्वासावर सुरू असल्याचे दिसून येत आहे.

संजय (बाबा) कोकाटे यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनानुसार, कंपनी आवश्यकतेपेक्षा अधिक वेंडर तयार करून मोठ्या प्रमाणावर केळी खरेदी करते आणि नंतर त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांची देणी थकवते. अलीकडे जवळपास २५ वेंडरांनी कोकाटे यांच्याकडे तक्रारी नोंदवल्या असून, विविध वेंडरमार्फत शेतकऱ्यांचे तब्बल २०० कोटी रुपयांपर्यंत देणे थकले असल्याचा दावा करण्यात आला आहे.

मागील तीन ते चार महिन्यांपासून पैसे न मिळाल्याने शेतकरी आणि वेंडर दोघेही मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. एका बाजूला शेतकरी आपल्या मालाचे पैसे मिळण्यासाठी वेंडरांच्या मागे फिरत आहेत, तर



दुसऱ्या बाजूला कंपनीकडून रक्कम न मिळाल्याने वेंडर युवक मानसिक तणावाखाली आले आहेत. काही युवकांवर आत्महत्येची वेळ येत असल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

या प्रकरणात आणखी एक गंभीर बाब पुढे आली आहे. जुने वेंडरांचे पैसे थकीत ठेवून कंपनी नवीन वेंडर तयार करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ही पद्धत पुढे सुरू राहिल्यास मोठी थकबाकी ठेवून कंपनी येथून अचानक निघून जाण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे कोकाटे यांनी म्हटले आहे.

कंपनीची मालमत्ता, बँक कर्ज आणि शेतकऱ्यांचे थकीत देणे यामध्ये मोठी तफावत असल्याचाही दावा करण्यात आला आहे. त्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी प्रशासनाने हस्तक्षेप करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर संजय (बाबा) कोकाटे यांनी प्रशासनाकडे काही ठोस मागण्या मांडल्या आहेत. कंपनीकडून थकीत रक्कम तातडीने वसूल करावी, तोपर्यंत नवीन केळी खरेदी थांबवावी आणि या प्रकरणातील जबाबदारांवर फौजदारी कारवाई करावी, अशी त्यांची मागणी आहे.

यासोबतच त्यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, येत्या ३१ मे पर्यंत शेतकरी आणि वेंडरांचे पैसे न दिल्यास कंपनीला खरेदी-विक्री करू दिली जाणार नाही. तसेच कोल्ड स्टोरेजमधील मालही बाहेर जाऊ दिला जाणार नाही. यामुळे होणाऱ्या कोणत्याही आर्थिक नुकसानास कंपनीच जबाबदार असेल, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे परिसरातील शेतकरी, वेंडर आणि स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासन या आरोपांची कितपत गंभीर दखल घेते आणि पुढे काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दुध वाहतुकीसाठी शिवप्रसाद उद्योग समूहाकडून इलेक्ट्रिक वाहनांचा वापर

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत शिवप्रसाद उद्योग समूहाकडून अध्यक्ष शरद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आता दूध वाहतुकीसाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर सुरू करण्यात आला आहे.



शिवप्रसाद मल्टिस्टेट सहकारी दूध संघाचे जाळे माळशिरस, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, इंदापूर, फलटण, मोहोळ, माण आणि खटाव अशा विविध तालुक्यांत पसरलेले आहे. या क्षेत्रातून होणाऱ्या दूध संकलनासाठी आता शरद बापू मोरे मोटार वाहतूक सहकारी संस्थेमार्फत इलेक्ट्रिक गाड्यांचा वापर करण्यात येत आहे. वाढते इंधन दर आणि परकीय चलनावरील ताण कमी करण्यासोबतच पर्यावरणाचे रक्षण करणे, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे.

केवळ कर्मचाऱ्यांना सल्ला न देता, शिवप्रसाद उद्योग समूहाच्या मॅनेजिंग डायरेक्टर यांनी स्वतः इलेक्ट्रिक चारचाकी वापरण्यास सुरुवात करून एक आदर्श निर्माण केला आहे. याशिवाय, दूध संघातील

डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांचा वापर २५ टक्क्यांनी कमी करण्यात आला असून, लांबच्या प्रवासासाठी

बस, मेट्रो आणि रेल्वे यांसारख्या सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय समूहाने घेतला आहे. शिवप्रसाद उद्योग समूहातील विविध विभागांतील कर्मचाऱ्यांचा पेट्रोल-डिझेलचा खर्च वाचावा आणि धावपळीत जाणारा वेळ वाचून कार्यक्षमता वाढावी, यासाठी आता दैनंदिन कामकाजात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा प्रभावी वापर सुरू झाला आहे. यामुळे कामासाठी होणारा प्रवास टाळला जात असून, त्याचा सकारात्मक परिणाम कामकाजावर दिसून येत आहे.

## वात्रटिका

### ऑडिओ क्लिप

सांगून गेले जुने लोक
त्यांचे म्हणने बरोबर होते...
भिंतीला कान असतात
हे सांगितले तेच खरे होते...
अश्लील बोलले कोणी
मागे कुटाळकीही केली...
मुखवटे फाटले टर्रटरा
ऑडिओ क्लिप बाहेर आली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सार्वजनिक शौचालयांच्या दुरवस्थेवर संभाजी ब्रिगेड आक्रमक

## 'महापालिकेतच शौचास बसून आंदोलना'चा इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील सार्वजनिक शौचालयांची वाढती दुरवस्था, अस्वच्छता आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात संभाजी ब्रिगेडने आक्रमक भूमिका घेतली असून, तातडीने सुधारणा न झाल्यास महानगरपालिका कार्यालयात शौचास बसून आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. शहरातील विविध भागांमध्ये सार्वजनिक शौचालयांची अत्यंत वाईट अवस्था झाल्याने नागरिकांना गंभीर त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे.

सिद्धेश्वर मंदिरासमोरील रहिमतबी टेकडी परिसरातील सार्वजनिक शौचालयाच्या दुरवस्थेमुळे तेथील सुमारे हजार ते बाराशे नागरिक त्रस्त असल्याचा मुद्दा पुढे आणत संभाजी ब्रिगेडच्या शिष्टमंडळाने सहाय्यक आयुक्त भोसले यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. परिसरातील शौचालयातून येणारी दुर्गंधी, अस्वच्छता आणि अपुरी सुविधा यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

या निवेदनाची तातडीने दखल घेत सहाय्यक आयुक्तांनी विभागीय कार्यालय प्रमुखांना संबंधित सार्वजनिक शौचालयाची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. तसेच शहरात प्रस्तावित वातानुकूलित आकांक्षा शौचालयासाठी पुढील महिन्यात निविदा प्रक्रिया काढण्यात येणार असून ते लवकरच नागरिकांसाठी सुरू केले जाईल, अशी माहितीही प्रशासनाकडून देण्यात आली.

संभाजी ब्रिगेडने शहरातील अनेक प्रभागांमधील सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांच्या परिस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अनेक ठिकाणी पाण्याची कमतरता, तुटलेले दरवाजे, अपुरी वीज व्यवस्था,



साफसफाईचा अभाव आणि अस्वच्छता यामुळे नागरिकांना शौचालय वापरणेही कठीण झाले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

विशेषतः मुख्य बाजारपेठांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित स्वच्छतागृहांचा गंभीर अभाव असल्याने बाहेर पडणाऱ्या महिलांची मोठी गैरसोय होत असल्याचा आरोप करण्यात आला. महिलांच्या मूलभूत सुविधांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली.

शहरात लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या ई-टॉयलेट प्रकल्पावरही संभाजी ब्रिगेडने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शहरात बसविण्यात आलेल्या १० ई-टॉयलेटपैकी एक-दोन वगळता बहुतांश ई-टॉयलेट बंद अथवा निष्क्रिय अवस्थेत असल्याचा आरोप करण्यात आला. तसेच शहरातील चार ठिकाणी उभारण्यात आलेली वातानुकूलित आकांक्षा शौचालये अद्याप जनतेसाठी सुरू करण्यात आलेली नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला.

याशिवाय होम मैदान परिसरातील कॉर्नरवर सिद्धेश्वर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसह स्थानिक नागरिकांसाठी स्वतंत्र सार्वजनिक शौचालय उभारण्याची मागणीही करण्यात आली आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे माजी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनल दास यांच्यासह मनीषा कोई, विक्रम वानकर, राजेंद्र माने, विशाल साळुंखे, आकाश भोसले, इरफान शेख, आकाश साळुंखे, इरफान कामतीकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक स्वच्छता ही शहराच्या मूलभूत नागरी व्यवस्थेचा भाग असताना, प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीयार्ने लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही संभाजी ब्रिगेडने दिला आहे.

# फायर ऑडीट सक्तीचे; नियमांचे पालन न केल्यास फौजदारी कारवाईचा इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील वाढती वर्दळ, बहुमजली इमारती आणि सार्वजनिक वापराच्या ठिकाणी उद्भवू शकणाऱ्या अग्नितांडवाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेने अग्निसुरक्षा व्यवस्थेबाबत कठोर भूमिका घेतली आहे. शहरातील सर्व मंगल कार्यालये, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, व्यापारी संकुले, हॉटेल्स, पेट्रोल पंप, बँका, कोचिंग सेंटर, सिनेमा हॉल्स तसेच विविध व्यावसायिक आस्थापनांना फायर सेफ्टी ऑडीट करून घेणे आणि आग प्रतिबंधक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (सुधारित अधिनियम २०२३) अंतर्गत इमारतींमध्ये आवश्यक आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षण यंत्रणा कार्यरत ठेवणे ही मालक आणि भोगवटाधारकांची थेट जबाबदारी आहे. संबंधित इमारतींनी आवश्यक तात्पुरती किंवा अंतिम आग संरक्षण मान्यता तसेच त्याचे वेळोवेळी नूतनीकरण करणे कायद्याने बंधनकारक आहे.

महापालिकेने जारी केलेल्या सूचनेनुसार, सर्व संबंधित व्यावसायिक व संस्था चालकांनी परवानाधारक अभिकरणामार्फत आपल्या आस्थापनांचे नियमित अग्निपरीक्षण करून घ्यावे. विशेष म्हणजे दर सहा महिन्यांनी म्हणजेच जानेवारी आणि जुलै महिन्यात वर्षातून दोन वेळा फायर ऑडीट करणे कायदेशीरदृष्ट्या अनिवार्य करण्यात आले आहे. या तपासणीत आढळणाऱ्या त्रुटींचे तातडीने निराकरण करणे देखील बंधनकारक राहणार आहे.

यामध्ये मंगल कार्यालये, प्रायव्हेट शाळा-कॉलेज, कोचिंग क्लासेस, नर्सिंग होम, हॉस्पिटल्स, पेट्रोल-डिझेल पंप, गॅस गोदामे, बँका, सरकारी व निमशासकीय कार्यालये, व्यापारी संकुले, मोठी व लहान व्यावसायिक कार्यालये, रेस्टॉरंट, हॉटेल्स तसेच बार अँड रेस्टॉरंट यांचा समावेश करण्यात आला आहे. सार्वजनिक वर्दळ असलेल्या सर्व इमारतींनी अग्निसुरक्षा नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महापालिकेने ही सूचना अंतिम नोटीस मानावी असेही स्पष्ट केले आहे. संबंधित व्यावसायिकांनी महाराष्ट्र शासनाने अधिकृत केलेल्या परवानाधारक संस्था किंवा एजन्सीद्वारे फायर सेफ्टीची पूर्तता करून घ्यावी, त्यातील त्रुटी दुरुस्त कराव्यात आणि अग्निसुरक्षा यंत्रणा अद्ययावत करावी. त्यानंतर फायर ऑडीटचा अहवाल सोलापूर महानगरपालिका अग्निशमन विभागाकडे सादर करून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक राहणार आहे.

विशेष म्हणजे, आग प्रतिबंधक उपाययोजना न करणे, फायर ऑडीट टाळणे किंवा बसवलेली अग्निशमन उपकरणे कार्यक्षम स्थितीत न ठेवणे हे गंभीर स्वरूपाचे मानले जाणार आहे. अशा परिस्थितीत अपघाताने आग लागल्यास होणाऱ्या जिवितहानी, आर्थिक नुकसान किंवा नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्यास संबंधित व्यावसायिक व मालकांना थेट जबाबदार धरले जाईल.

महापालिकेने स्पष्ट इशारा दिला आहे की, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत कलम ३६ आणि ३८ नुसार फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील व्यावसायिक, संस्था चालक आणि मालमत्ता धारकांनी याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

सोलापूर शहरातील वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक सुरक्षेसाठी फायर सेफ्टीचे नियम केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात काटेकोरपणे राबवले जाणे आवश्यक असल्याची चर्चा आता शहरात सुरू झाली आहे.

# पत्रकारांच्या प्रश्नांपासून सत्ताधारी दूर; माध्यमेही लोकांच्या खऱ्या प्रश्नांपासून भरकटली : सुप्रिया श्रीनेत

**दिल्ली (वृत्त सेवा):-** देशातील प्रेस स्वातंत्र्य, पत्रकार परिषदांची परंपरा आणि माध्यमांच्या बदलत्या भूमिकेवरून केंद्र सरकारवर तसेच काही माध्यम संस्थांवर जोरदार टीका करण्यात आली आहे. पत्रकारांच्या प्रश्नांना सामोरे जाण्याऐवजी त्यापासून दूर राहणाऱ्या सत्ताधाऱ्यांना माध्यमांचा एक वर्ग अप्रत्यक्ष पाठिंबा देत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेत्या आणि राष्ट्रीय प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी केला. त्यामुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या माध्यमांच्या भूमिकेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी पत्रकार परिषद आणि संवाद संस्कृतीवर भाष्य केले. लोकशाही व्यवस्थेत पत्रकार परिषद हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याचे, उत्तरदायित्व निश्चित करण्याचे आणि जनतेसमोर सत्य मांडण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र सध्याच्या काळात पत्रकारांच्या थेट प्रश्नांपासून टाळाटाळ करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याची टीका त्यांनी केली.

त्यांच्या मते, पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी निवडक संवाद, पूर्वनियोजित मुलाखती आणि नियंत्रित माहिती देण्याची पद्धत वाढत आहे. अशा परिस्थितीत सत्ताधाऱ्यांवर प्रश्न विचारण्याऐवजी त्यांची भूमिका पुढे नेण्याचे काम काही माध्यमांकडून होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

सुप्रिया श्रीनेत यांनी म्हटले की, माध्यमांचे मूलभूत कर्तव्य म्हणजे जनतेच्या समस्या, बेरोजगारी, महागाई, शेतकरी प्रश्न, महिलांच्या सुरक्षिततेचे मुद्दे आणि सामाजिक प्रश्नांना प्राधान्य देणे. मात्र अनेकदा हे प्रश्न बाजूला पडत असून लोकांचे दैनंदिन आयुष्य प्रभावित करणाऱ्या मुद्द्यांऐवजी वेगळ्याच विषयांवर लक्ष केंद्रित केले जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

त्यांनी माध्यमांच्या स्वायत्ततेवरही भाष्य करताना सांगितले की, पत्रकारितेचे उद्दिष्ट सत्तेला प्रश्न विचारणे आणि जनतेसाठी उत्तर शोधणे हे असते. माध्यमांनी लोकशाहीच्या मूल्यांशी तडजोड न करता स्वतंत्र आणि निष्पक्ष भूमिका ठेवणे आवश्यक आहे. पत्रकारितेचा केंद्रबिंदू जनतेचे प्रश्न असायला हवेत, अन्यथा लोकशाहीच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

देशातील प्रेस स्वातंत्र्याबाबत वारंवार निर्माण होणाऱ्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर सुप्रिया श्रीनेत यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय आणि माध्यम क्षेत्रात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. पत्रकारितेची दिशा, माध्यमांची भूमिका आणि सत्तेशी असलेले संबंध यावर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित होत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# NEET परीक्षा घोटाळ्यातील दोषींना फाशीची शिक्षा देण्याची भीम आर्मीची मागणी

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** NEET परीक्षा घोटाळ्यामुळे ४ विद्यार्थ्यांची आत्महत्या; पालकांचे संसार उद्ध्वस्त, विद्यार्थ्यांमध्ये तीव्र मानसिक तणाव नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) मार्फत घेण्यात आलेल्या 'नीट' (NEET) वैद्यकीय प्रवेश परीक्षेत झालेल्या प्रचंड गैरव्यवहार आणि घोटाळ्यामुळे संपूर्ण देशातील विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घोटाळ्याच्या नैराश्यातून आतापर्यंत देशातील चारहून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली आहे. ही आत्महत्या नसून सरकारी अनास्थेने केलेली हत्या आहे. त्यामुळे या घोटाळ्याला जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी, दलाल आणि संस्थाचालकांना मरेपर्यंत फाशीची शिक्षा देण्याची मागणी भीम आर्मीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष उत्तरेश्वर कांबळे यांनी प्रसार माध्यमातून केली आहे.



यावेळी बोलताना कांबळे म्हणाले कि, गेल्या आठवड्यापासून सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, कोकण या भागातील कार्यकर्त्यांकडून सविस्तर माहिती घेतली असताना नीट परीक्षार्थी पालक व विद्यार्थी हतबल झाले असल्याचे समजले. वैद्यकीय क्षेत्रात जाऊन देशाची सेवा करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गरीब आणि मध्यमवर्गीय पालकांनी आपले आयुष्य पणाला लावले होते. अनेक पालकांनी आपली हक्काची शेतजमीन (रान) विकली, काहींनी राहते घर गहाण ठेवून किंवा विकून मुलांच्या कोचिंग क्लासेसची आणि शिक्षणाची फी भरली. रक्ताचे पाणी करून पालकांनी गोळा केलेला पैसा आणि मुलांची मेहनत या घोटाळ्यामुळे एका झटक्यात मातीत मिळाली आहे. पेपर फुटी आणि गुणांमधील फेरफारमुळे पात्र विद्यार्थ्यांना डावलून पैसेवाल्यांना प्रवेश मिळत असल्याने प्रामाणिक विद्यार्थी सध्या तीव्र मानसिक तणावाखाली आहेत. पेपरफुटीच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांची अवैध उलाढाल होते. सत्ताधाऱ्यांच्या जवळ राहिल्याने शासकीय गोपनीय बैठका, परीक्षांचे नियोजन आणि कंत्राट कोणाला मिळणार, याची गुप्त माहिती या दलालांना आधीच कशी मिळते. पेपर फुटीचे धागेदोरे हे सत्तेसोबत असणा-या लोकांच्या सभोवताली फिरत आहे. यामुळे याची सखोल चौकशी करून संबंधित आरोपींच्या घरावर बुलडोझर फिरविण्याची हिम्मत सत्ताधारी मंडळींत आहे का? सरकारमधील यंत्रणाच बरबरटलेली असल्याने असे प्रकार घडत असल्याची टिका उत्तरेश्वर कांबळे यांनी केली आहे.

# स्मार्ट प्रकल्पांतर्गत उत्पादक भागीदारी उपप्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करा - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत उत्पादक भागीदारी उपप्रकल्पासाठी अनुदान वितरणाबाबत सर्व बाजूंनी सखोल तपासणी करून प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश कृषीमंत्री दतात्रय भरणे यांनी दिले. मंत्रालयात आयोजित स्मार्ट प्रकल्पाच्या आढावा बैठकीत उत्पादक भागीदारी उपप्रकल्पांतर्गत प्रथम अनुदान हप्ता वितरणास मुदतवाढ देण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. बैठकीला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे स्मार्ट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक प्रदीप चंद्रन, कृषी संचालक सुनिल बोरकर, उपसचिव गणेश कचरे तसेच फार्मेक्सो ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, रेंदाळचे धन्यकुमार कोळी आणि महावीर पाटील उपस्थित होते. कृषि मंत्री दतात्रय भरणे म्हणाले की, अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेता शेतकरी व उत्पादक संस्थांच्या हितासाठी सकारात्मक भूमिका घेत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण होण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसने उतरावे

## काकासाहेब कुलकर्णी यांची पक्षश्रेष्ठींकडे जोरदार मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षात हालचालींना वेग आला असून, महाविकास आघाडीच्या माध्यमातून काँग्रेसने अधिकृत उमेदवार देऊन ही निवडणूक लढवावी, अशी ठाम मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश प्रवक्ता काकासाहेब कुलकर्णी यांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कुलकर्णी यांनी दिलेल्या निवेदनात सोलापूर जिल्ह्यातील सध्याची राजकीय परिस्थिती, स्थानिक स्वराज्य



संस्थांमधील पक्षीय समीकरणे आणि काँग्रेसची संघटनात्मक ताकद यांचा सविस्तर आढावा घेत काँग्रेसला या जागेवर प्राधान्य मिळाले पाहिजे, असा दावा केला आहे. जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची मजबूत संघटनात्मक पकड असून तळागाळात कार्यकर्त्यांचे विस्तृत जाळे सक्रिय असल्याचे त्यांनी नमूद केले.

त्यांनी म्हटले आहे की, अनेक वर्षांपासून काँग्रेस विचारसरणीशी निष्ठावान कार्यकर्ते ग्रामीण तसेच शहरी भागात सातत्याने काम करत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही काँग्रेसशी संबंधित पदाधिकारी, माजी सदस्य आणि समर्थक मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार दिल्यास पक्षाला मोठा फायदा होऊ शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मागील विधान परिषद निवडणुकीत ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे होती. मात्र त्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा पराभव झाला होता. या पार्श्वभूमीवर जुनी राजकीय समीकरणे बदलण्याची आणि नव्या रणनीतीने निवडणूक लढवण्याची गरज निर्माण झाल्याचे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. केवळ पारंपरिक वाटपावर भर न देता स्थानिक पातळीवरील जनाधार, कार्यकर्त्यांची ताकद आणि संघटनात्मक क्षमता या निकषांवर उमेदवारी निश्चित व्हावी, अशी त्यांची भूमिका आहे.

महाविकास आघाडीत काँग्रेस हा ्मोठा भाऊ् असल्याचा उल्लेख करताना त्यांनी सोलापूर जिल्ह्यात काँग्रेसची राजकीय मुळे अधिक व्यापक असल्याचा दावा केला. जिल्ह्यातील अनेक नगरपरिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती तसेच विविध स्थानिक संस्थांमध्ये काँग्रेस विचारधारेचे पदाधिकारी प्रभावीपणे कार्यरत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

याशिवाय, सोलापूरची विधान परिषद जागा महाविकास आघाडीच्या दृष्टीने राजकीयदृष्ट्या महत्त्वाची असल्याने आघाडी अधिक मजबूत करण्यासाठी काँग्रेसला संधी देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. काँग्रेसचा विचार आजही शेतकरी, युवक, कामगार, सर्वसामान्य नागरिक आणि वंचित घटकांमध्ये प्रभावी असल्याचा दावा करत, काँग्रेसचा उमेदवार दिल्यास कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल आणि निवडणुकीत सकारात्मक वातावरण तयार होईल, असेही त्यांनी म्हटले.

शेवटी, पक्षश्रेष्ठींनी सोलापूर जिल्ह्यातील वास्तव राजकीय परिस्थिती, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील काँग्रेसची ताकद आणि कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन महाविकास आघाडीत काँग्रेस पक्षाला ही जागा द्यावी, अशी अपेक्षा काकासाहेब कुलकर्णी यांनी व्यक्त केली आहे.


# Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळया समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 255

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | | | 2 | 7 | 3 | |
| 7 | | | 1 | 8 | | | 4 | 9 |
| | 8 | | 3 | | 4 | 6 | 5 | |
| | | 3 | | 4 | 9 | | | |
| | | 7 | | | 1 | 8 | 9 | 4 |
| | | | 8 | 2 | | | 6 | |
| 3 | | 9 | | | 8 | 4 | | |
| 1 | | 5 | 4 | | 6 | | 8 | 2 |
| | 4 | | 7 | 5 | | | | |

# टेंभुर्णीत चार दुकाने जळून खाक एक कोटभर रुपयांचे नुकसान



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी ता माढा येथे चार दुकाने जळून खाक होऊन झालेल्या नुकसानीत जवळपास कोटभर रुपयांन पेक्षा जास्त नुकसान झाले असून नागरिकांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे जीवीत हानी झाली नाही ही घटना मंगळवारी दि.१९ रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत अधिक माहिती अशी कि टेंभुर्णी येथील टेंभुर्णी-करमाळा रोड लगत असलेल्या पुष्पक मंगल कार्यालया शेजारील लगत असलेल्या गाड्यांमध्ये असलेल्या फर्निचर च्या दुकानत मंगळवारी सायंकाळी सातच्या दरम्यान भुस्याला आग लागली होती ती विझवताना सामान बाहेर काढल्यानंतर शेजारी असलेल्या हार्डवेअर दुकानाच्या बाहेर असलेल्या प्लॅस्टिक साहित्याने पेट घेतला दरम्यान वारे जोरात सुटल्याने आगीने रोद्र रूप धारण केले यामध्ये राऊत आणि आकाश सुतार यांची दोन फर्निचर ची दुकाने व महेश तोडकर यांचे हार्डवेअर,व वैभव तोडकर इलेक्ट्रॉनिक्स दुकाने जळत होती यावेळी विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे व इंदापूर नगरपरिषदेचे अग्निशामक दलाने आग विझविली तोपर्यंत चारी दुकानातील साहित्य जळून खाक झाले यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि हार्डवेअर चे एक कोटी रूपयांचे च्या पुढे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.तसेच शेजारीच असलेल्या बारामती अर्बन बँकेच्या खिडकीतून ज्वाला आत जाऊन कागद पत्रांनी पेट घेतला होता.परंतु युवकांनी व कर्मचा-यांनी तातडीने सामान बाहेर काढले.ही घटना सायंकाळच्या सुमारास घडल्याने बघ्यांनी मोठी गर्दी केली होती.टेंभुर्णी पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

# गुणवत्तापूर्ण शिक्षण, सक्षम विद्यार्थी आणि हरित भविष्याचा संकल्प- चेतनसिंह केदार सावंत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिक्षणासोबत पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देत सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभागाने यंदाच्या आषाढी वारीत एक अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. पंढरपूर आणि माळशिरस तालुक्यात तब्बल ५ लाख सीडबॉल तयार करून वारकरी भाविकांना वाटप करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण व आरोग्य सभापती तथा भाजप जिल्हाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.



करमाळा पंचायत समितीच्या बचत भवनात पार पडलेल्या जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या मासिक आढावा बैठकीत हा महत्त्वाकांक्षी निर्णय जाहीर करण्यात आला. बैठकीत शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वाढ, विद्यार्थ्यांचे भविष्य, शिक्षक समायोजन, शिष्यवृत्ती योजना आणि शाळांच्या विकासावर व्यापक चर्चा झाली.

बैठकीस जि.प. सदस्य चंद्रकांत जाधव, श्रुतीताई भोरगुंडे, सुषमाताई नारनवर, पंचायत समिती सभापती दिपाली ताड, पूजाताई ढेरे यांच्यासह शिक्षणाधिकारी कादर शेख, सचिन जगताप आणि विविध तालुक्यांतील गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी गणित व विज्ञान विषयांवर विशेष भर देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वसतिगृह सुविधा, क्रीडा विकास आणि डिजिटल शिक्षण यावरही सकारात्मक चर्चा झाली.

दरम्यान, अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रियेला वेग देण्यात आला असून ११६ शिक्षकांचे समायोजन पूर्ण झाले आहे, तर ६७२ रिक्त पदांबाबत कार्यवाही सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

आषाढी वारीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचविण्यासाठी सीडबॉल वाटपाचा उपक्रम राबविण्यात येणार असून, 'वारीतून हरित क्रांती' घडविण्याचा निर्धार शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे. शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारा हा उपक्रम जिल्हाभर चचेर्चा विषय ठरत आहे.

# करजगीच्या श्री चौडेश्वरी देवी यात्रा वादाला नवे वळण; धर्मादाय सहआयुक्तांकडून स्थगिती

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):** अक्कलकोट तालुक्यातील करजगी येथील प्रसिद्ध श्री चौडेश्वरी देवी मंदिर यात्रा उत्सव व्यवस्थापनाच्या प्रकरणाला नवे आणि महत्त्वपूर्ण वळण मिळाले असून, या प्रकरणात पुणे येथील धमार्दाय सहआयुक्तांनी स्थगिती आदेश दिल्याने मंदिर व्यवस्थापन आणि यात्रेच्या आयोजनासंदभार्तील वाद पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्री चौडेश्वरी देवी मंदिर संस्थेच्या यात्रा उत्सवाच्या आयोजनासंदर्भात एकूण चार वेगवेगळ्या अर्जदारांनी महाराष्ट्र सार्वजनिक न्यास अधिनियमाच्या कलम ४१(सी) अंतर्गत सोलापूरचे सहाय्यक धमार्दाय आयुक्त, एस.पी. पाईकराव यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केले होते. यात्रेच्या व्यवस्थापनावर आणि अधिकारांवरून निर्माण झालेल्या वादामुळे या प्रकरणाला सुरुवातीपासूनच महत्त्व प्राप्त झाले होते.

विशेष म्हणजे, या चारही अर्जदारांनी संबंधित अधिनियमाच्या कलम ७३-अ अंतर्गत पक्षकार जोडणीसाठी स्वतंत्र अर्ज सादर केले होते. प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान मागील वर्षातील आदेशांचा आधार घेत सोलापूरचे सहाय्यक धमार्दाय आयुक्त, एस.पी. पाईकराव यांनी एका विशिष्ट अर्जदाराच्या बाजूने भूमिका घेतल्याचे निदर्शनास आल्याचा दावा उर्वरित अर्जदारांनी केला.

यामुळे उर्वरित तीन अर्जदारांनी महाराष्ट्र सार्वजनिक न्यास अधिनियमातील नियम ३६(३) अंतर्गत बदली अर्ज दाखल करत हे प्रकरण दुसऱ्या कार्यालयात वर्ग करण्यात यावे, अशी मागणी धमार्दाय सहआयुक्त, पुणे यांच्याकडे केली. या अजार्मुळे प्रकरणाला आणखी वेगळे वळण मिळाले.

दि. १८ मे २०२६ रोजी पुणे येथे या बदली अर्जावर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. खतिब वकील, ॲड. एम. एन. पामुल, ॲड. बालराज कैरमकोंडा, ॲड. अब्दुलाह खतिब आणि ॲड. स्वप्नील पुंजाल यांनी सविस्तर युक्तिवाद मांडत विविध कायदेशीर बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि कागदपत्रांचा अभ्यास केल्यानंतर धर्मादाय सहआयुक्त, पुणे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय देत मुख्य हस्तांतरण अथवा वर्ग होऊन मिळण्याच्या अर्जावर अंतिम निर्णय होईपर्यंत सदर प्रकरणास स्थगिती देण्याचे आदेश जारी केले.

या निर्णयामुळे करजगी येथील श्री चौडेश्वरी देवी मंदिर यात्रा व्यवस्थापनाच्या वादाकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. यात्रा आयोजन, व्यवस्थापन आणि संबंधित अधिकारांबाबत पुढे काय निर्णय होणार, याबाबत उत्सुकता वाढली असून आगामी सुनावणी निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे मंदिर प्रशासन, ग्रामस्थ आणि संबंधित पक्षांमध्ये चर्चांना उधाण आले असून पुढील कायदेशीर घडामोडींवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# डिझेल टंचाईमुळे पेरणीपूर्व मशागतीची कामे ठप्प; शेतकरी संकटात, सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा - हेमंत पाटील

**पुणे (कटूसत्य वृत्त):** राज्यात मान्सूनपूर्व शेती मशागतीची कामे अंतिम टप्प्यात असतानाच ग्रामीण भागात निर्माण झालेल्या डिझेलच्या तीव्र तुटवड्यामुळे शेतकऱ्यांसमोर नव्या संकटाने डोके वर काढले आहे. ट्रॅक्टर आणि शेती अवजारांसाठी आवश्यक डिझेल उपलब्ध होत नसल्याने नांगरणी, वखरणी आणि पेरणीपूर्व मशागतीची कामे अक्षरशः ठप्प झाली आहेत. यामुळे आगामी खरीप हंगामावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून, भारत अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी सरकारने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा, अशी जोरदार मागणी केली आहे.



राज्यातील अनेक ग्रामीण भागांत सध्या पेट्रोल पंपांवर ह्यनो स्टॉकह्णचे फलक झळकत असून, डिझेलसाठी वाहनांच्या लांबलचक रांगा लागत असल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. लातूर, हिंगोली, वाशीम, जालना, परभणी तसेच सांगली-कोल्हापूर पट्ट्यात शेतकऱ्यांना इंधनासाठी तासनतास प्रतीक्षा करावी लागत असल्याची माहिती समोर येत आहे.

अनेक पेट्रोल पंपांवर मर्यादित प्रमाणात डिझेल दिले जात असून काही ठिकाणी वाहननिहाय रेशनिंग सुरू करण्यात आले आहे. परिणामी, शेतकऱ्यांना शेती मशागतीसाठी आवश्यक असलेले पुरेसे इंधन मिळत नाही. एका एकर जमिनीची मशागत करण्याइतके डिझेलही मिळत नसल्याने शेतीची कामे अपूर्ण राहत आहेत.

या परिस्थितीचा सर्वाधिक फटका त्या शेतकऱ्यांना बसत आहे, ज्यांच्याकडे स्वतःचे ट्रॅक्टर नाहीत. अनेक ट्रॅक्टर चालकांनी "आधी डिझेल आणून द्या, मगच शेती नांगरून देऊ" अशी भूमिका घेतल्याने भाड्याने मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांची मोठी आर्थिक कोंडी झाली आहे. आधीच वाढत्या खचार्मुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर आता इंधन टंचाईचे संकट ओढवले आहे.

हेमंत पाटील यांनी या परिस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त करत सांगितले की, शेतीचे वेळापत्रक निसगार्शी निगडीत असते. मशागतीसाठी योग्य वेळ हातातून गेल्यास संपूर्ण खरीप हंगाम धोक्यात येऊ शकतो. पेरणीत उशीर झाल्यास उत्पादनावर थेट परिणाम होईल आणि त्याचा फटका शेवटी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला बसेल.

त्यांनी सरकारवर अप्रत्यक्षपणे प्रश्नचिन्ह उपस्थित करत विचारले की, शेतीप्रधान राज्यात ऐन हंगामाच्या काळात डिझेल टंचाईसारखी गंभीर समस्या निर्माण होणे ही प्रशासनाची मोठी अपयशाची बाब आहे. ग्रामीण भागातील परिस्थितीची दखल घेत शासनाने तेल कंपन्यांशी तातडीने समन्वय साधावा आणि ग्रामीण पेट्रोल पंपांना अतिरिक्त डिझेल कोटा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

यासोबतच डिझेल टंचाईच्या नावाखाली साठेबाजी, कृत्रिम तुटवडा निर्माण करणे किंवा काळाबाजार होत असल्यास संबंधितांवर कठोर फौजदारी कारवाई करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. अन्नदात्याला संकटातून बाहेर काढण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेण्याची गरज असल्याचे पाटील यांनी नमूद केले.

सध्या राज्यातील शेतकरी पावसाच्या आगमनाची आणि शेतीच्या नव्या हंगामाची तयारी करत आहेत. मात्र दुसरीकडे डिझेल टंचाईमुळे शेतीची चाके थांबण्याची वेळ आली आहे. सरकारने वेळेत हस्तक्षेप केला नाही, तर इंधन टंचाईचे संकट केवळ शेतीपुरते मर्यादित राहणार नाही, तर त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# तडवळे येथील जि.प.शाळेतील 131 विद्यार्थी पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

**तडवळे (कटूसत्य वृत्त):-** फेब्रुवारी 2026 मध्ये झालेल्या शिष्यवृत्त परीक्षेत तडवळा पॅटर्न पुन्हा एकदा सिद्ध झाला असून कन्या शाळा 69 मुली व मुलांच्या शाळा 62 मुले असे एकूण परीक्षेत 131 विद्यार्थी पात्र झाले आहेत.त्यापैकी कन्या शाळेतील 33 मुली तर मुलांच्या शाळेतील 12 मुले 200 गुणांच्या पुढे आहेत. जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळेत तील 69 विद्यार्थिनी पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाल्या आहेत. यामध्ये संस्कृती लोमटे, लंगडे राधिका,सायली खैरे, भिसे स्वराली, अडसुळ पद्मश्री, गावखरे स्वरा, रोनक शेख, कोकाटे ऋतुजा, जोशी आर्या, नलावडे स्वरा, करंजकर ग्रंथाली, पाटील आरोही, कसबे तक्षशिला बन्सी, गावखरे समृद्धी,पंडित आनंदी,शिंदे प्रतिक्षा, मडके श्रावणी, आवाड अनुष्का, एडके धनश्री, जगताप सुहानी, पाटील स्वरा,वाघे मिनल, तिबोले त्रिशा,पाटील गिरिजा,दांगट मनाली, माने अदिती, शिंनगारे परिनिती, साळुंखे ईश्वरी, कांबळे श्रीनिधी, कदम अनुष्का, माने सई, तौर आरती, शिंदे अदिती,वीर पूनम,निकम आरोही, जाधव राजनंदिनी, शेळके गीतांजली शेषेराव, मते संचिता, मुंडे प्रियंका, शेळके रुधिरा, नकाते शिवलीला, कदम श्रेया, करंजकर स्वराजंली,देशमाने आरोही, गुरव ईश्वरी,तांबोळी अनायझा, चौरे स्वरा,क्षीरसागर मनश्री, शिंदे वैष्णवी, गायकवाड गायत्री, काटवटे सर्वस्वी, करंजकर सई, करंजकर समीक्षा, कदम भार्गवी, शेख रिफत, तांबोळी अक्सा, खारगे ईश्वरी, काटवटे नम्रता, नागटिळक प्रियदर्शनी, जमाले नेत्रा, भोसले रिया, वारे समृद्धी, माने प्रियदर्शनी, काटवटे सई, शिंदे अदिती, कसबे स्नेहल, लांडगे सुवर्णा, भालेराव जयंती, भोसले ईश्वरी पात्र झाल्या आहेत. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत जि.प.आदर्श केंद्रिय प्राथमिक शाळा कसबे तडवळे ता.जि.धाराशिव येथील 62 विद्यार्थी पात्र झाले असून त्यामध्ये आहिल कोरबू, उमेद शेख,कैवल्य गरड,सयाजी पाटील, श्रवण बोडके, उत्कर्ष शेटे, सक्षम शिंदे,अर्णव करंजकर, ज्ञानराज जमाले,रूद्र लोमटे, विश्वजीत मेटे,केतन शिंदे, राजवीर वाकुरे, आरव शिंदे, श्रीनिवास कुलकर्णी, रूदकांत बेद्रे, वेदांत जमाले, अदनान कोरबू , समर्थ करंजकर, ओमकार मिसाळ, व्यंकटेश पाटील,स्वरूप शिंदे, शिवतेज गावखरे,ऋषिकेश मनके, आदित्य भुजबळ,सर्वेश कोष्टी,पृथ्वीराज डोके, यश घोडके, सन्मित भालेराव, श्रीनय वाघमारे, प्रथमेश करंजकर, आर्यन थोरवे, विक्रांत दिक्षीत, श्रीराज वाघमारे, आयुष करंजकर,रूद्रजीत बोडके, राघव बोरकर, सम्राट समुद्रे, सागर शेंडगे, अभय पवार,यासीन पटेल, युवराज जमाले, कार्तिक राहींज, विराज गवाड, आरूष सुरवसे, आदित्य लोंढे,अरशान शेख, कृष्णा भांड, श्लोक सुतार, सोहम भराटे, प्रतिक जाधव, जय लंगडे, सार्थक मनके, सागर मनके, शिवरत्न कोरे, संकल्प बाहेती, समाधान माळी, अमितेश पवार, समर्थ मिसाळ,श्लोक गुरव, रूद्र पाटोळे, श्रीराम जमाले विद्यार्थी पात्र झाले आहेत. कन्या शाळेतील मुलींना मुख्याध्यापक रहिमान सय्यद, तडवळा पॅटर्नचे जनक जगन्नाथ धायगुडे,शहाजी पुरी, पांडुरंग तनमोर, अंबिका कोळी, क्रांती मते, संजय देशटवाड, ऋषीकेश पवार, भिमाशंकर फुलारी,उषा वरूडकर,रामकृष्ण ढवळे यांचे मार्गदर्शन लाभले तर मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक केशवराव पवार, बाळासाहेब जमाले,शर्मिला जमाले,मोहम्मद नदाफ ,हेमलता चांडगे, शरयू पवार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे केंद्रीय व कन्या शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, शिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे, गटशिक्षणाधिकारी असरार सय्यद, विस्ताराधिकारी किशोरी जोशी, केंद्रप्रमुख जगदीश जाकते यांनी अभिनंदन केले आहे.

# करमाळा-टेंभुर्णी मार्गावर भीषण अपघात; दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू, एक गंभीर जखमी

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा-टेंभुर्णी मुख्य मार्गावरील आदिनाथ सहकारी साखर कारखाना गेटसमोर बुधवारी (दि.२०) दुपारी सुमारे १.१५ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून काही काळ वाहतुकीतही गोंधळ निर्माण झाला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, दुचाकी क्रमांक MH-45 W 4325 वरून दोन जण करमाळा-टेंभुर्णी मार्गाने प्रवास करत होते. यावेळी आदिनाथ कारखान्याच्या गेटसमोर भरधाव आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की दुचाकीवरील अभिमान मारुती कौले (वय ६०, रा. भोगेवाडी, ता. माढा) यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात रोहिदास दिगंबर कौले (वय ४२, रा. भोगेवाडी, ता. माढा) हे गंभीर जखमी झाले असून, अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत जखमीला करमाळा येथील रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, धडक देणारे वाहन ट्रक असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र धडक दिल्यानंतर संबंधित वाहन चालक घटनास्थळावर न थांबता फरार झाला. त्यामुळे नेमके वाहन कोणते होते, याबाबत पोलिस तपास सुरू होण्याची शक्यता आहे.

घटनेची माहिती परिसरात पसरताच नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. अपघाताची तीव्रता पाहून उपस्थित नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत होता. या मार्गावर भरधाव वाहनांमुळे अपघातांची मालिका सुरू असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# महापुरुषांचा अवमान रोखण्यासाठी कठोर कायद्याची मागणी

## अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीवरही भर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):** राज्यात गेल्या काही काळात महापुरुषांविषयी बेजबाबदार वक्तव्ये करून त्यांचा अवमान करण्याच्या घटना सातत्याने घडत असून संबंधितांवर कठोर कारवाई होत नसल्याने अशा प्रवृत्ती अधिकच निर्ढावल्याची चिंता व्यक्त करत आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे कठोर कायद्याची मागणी केली आहे. महापुरुषांबाबत चुकीची आणि समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन केली.

यावेळी रोहित पवार यांनी मुख्यमंत्री यांना यासंदर्भातील सविस्तर निवेदनही सादर केले. राज्यातील सामाजिक सलोखा आणि प्रबोधनवादी विचारांवर परिणाम करणाऱ्या घटनांकडे गांभीयार्ने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

रोहित पवार यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र ही महापुरुषांची आणि समाजसुधारकांची भूमी म्हणून ओळखली जाते. अशा राज्यात समाजातील प्रेरणास्थान असलेल्या महापुरुषांबाबत सातत्याने आक्षेपार्ह, चुकीची आणि बेजबाबदार वक्तव्ये केली जात असतील तर ती बाब राज्याच्या प्रतिमेला धक्का देणारी आहे. या प्रकारांमुळे सामाजिक वातावरणही दूषित होण्याचा धोका निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यासोबतच राज्यातील अंधश्रद्धा, जादूटोणा, अघोरी प्रथा आणि भोंदूगिरीच्या वाढत्या घटनांबाबतही त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. समाजातील अनेक नागरिक अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन आर्थिक, मानसिक आणि सामाजिक फसवणुकीचे बळी ठरत आहेत. काही प्रकरणांमध्ये तर कुटुंबे उद्ध्वस्त झाल्याच्या घटनाही समोर येत असल्याने या विषयाकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदा अस्तित्वात असला तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची बाबही त्यांनी अधोरेखित केली. त्यामुळे संबंधित कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्पष्ट नियमावली तयार करण्यात यावी, तसेच यंत्रणांना अधिक सक्षम करण्याची मागणी त्यांनी केली.

या विषयावर आपण यापूर्वी महामहीम राज्यपाल यांची भेट घेऊनही निवेदन दिले असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. राज्यपालांनीही या विषयाची दखल घेत शासनाला कायद्याबाबत पत्र पाठविल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, महापुरुषांचा सन्मान, सामाजिक सलोखा आणि अंधश्रद्धामुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या या मागणीमुळे राज्यातील सामाजिक आणि राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आता शासन यावर कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मनपा स्टोअरची महापौरांकडून पाहणी; सुरक्षा, सीसीटीव्ही आणि नोंद व्यवस्थेवर भर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विभागांतील साहित्य व्यवस्थापन, सुरक्षा यंत्रणा आणि प्रशासनिक शिस्त अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने आज महापौर विनायक कोंड्याल यांनी नगर अभियंता विभागाच्या स्टोअर तसेच अतिक्रमण विभागाच्या स्टोअरची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे हेही उपस्थित होते. पाहणीदरम्यान स्टोअरमधील सुरक्षा, साहित्य साठवणूक, ये-जा नोंद प्रणाली आणि एकूणच प्रशासनिक कार्यपद्धतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका अक्कूलवार, नियंत्रणाधिकारी तपन डंके यांच्यासह संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिकाऱ्यांकडून स्टोअरमधील विद्यमान यंत्रणा, साहित्य हाताळणी आणि सुरक्षाविषयक उपाययोजनांची माहिती घेण्यात आली.

पाहणीदरम्यान महापौर विनायक कोंड्याल यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना देत स्टोअर परिसरातील प्रत्येक हालचालीवर काटेकोर नियंत्रण ठेवण्याचे आदेश दिले. विभागात येणाऱ्या आणि जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र नोंद ठेवण्यासाठी तातडीने मस्टर प्रणाली सुरू करण्याचे निर्देश त्यांनी दिले. याशिवाय परिसरात येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या सर्व वाहनांचीही स्वतंत्र व व्यवस्थित नोंद ठेवण्याची प्रणाली विकसित करण्याच्या सूचना करण्यात आल्या.

अलीकडेच घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे आवश्यक असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले. भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुचित घटना घडू नयेत यासाठी संपूर्ण परिसरात अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश देण्यात आले. यासोबतच प्रशासनाने अधिक सतर्क आणि जबाबदार राहून तात्काळ आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, असेही निर्देश देण्यात आले.

स्टोअरमधील व्यवस्थापन अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध आणि सुरक्षित करण्यावर भर देताना महापौरांनी नियमित तपासणी व देखरेखीची यंत्रणा अधिक मजबूत करण्याची गरज व्यक्त केली. शासकीय मालमत्तेच्या संरक्षणाबाबत कोणतीही निष्काळजीपणा सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना महापौरांनी सांगितले की, "महानगरपालिकेची प्रत्येक मालमत्ता, साहित्य आणि कार्यालयीन व्यवस्था ही जनतेची संपत्ती आहे. त्यामुळे तिचे संरक्षण, योग्य देखभाल आणि पारदर्शक नोंद प्रणाली अत्यंत महत्त्वाची आहे. सुरक्षा व्यवस्थेमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सीसीटीव्ही, मस्टर नोंद आणि नियंत्रण यंत्रणा अधिक सक्षम केली जाईल."

या पाहणीनंतर महानगरपालिका प्रशासनाकडून सुरक्षा आणि शिस्तीबाबत अधिक कडक भूमिका घेतली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, विभागीय कामकाज अधिक पारदर्शक करण्यासाठी नव्या उपाययोजनांची अंमलबजावणी लवकरच होण्याचे संकेत मिळत आहेत.

# बालविवाहाविरोधात रजनीगंधांचा एल्गार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समाजातील बालविवाह, अल्पवयीन मातृत्व आणि बालकामगार यांसारख्या गंभीर प्रश्नांवर धडक काम करत प्रशासनालाही जागे करणाऱ्या सोलापूरच्या सौ. रजनीगंधा संदीप गायकवाड सध्या चचेर्चा विषय ठरत आहेत. महानगरपालिका आरोग्य विभागातील तब्बल ८६ अल्पवयीन मातांची नोंद शोधून काढत, संबंधित माहिती विविध प्रशासकीय विभागांना ई-मेलद्वारे पाठवून त्यांनी मोठी खळबळ उडवून दिली आहे.

या प्रकरणामुळे प्रशासन, पोलीस विभाग, डॉक्टर आणि संबंधित यंत्रणांची धावपळ सुरू झाली. अनेकांवर गुन्हे दाखल करण्यात आले, तर काहींना चौकशीला सामोरे जावे लागले. या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणीही आता जोर धरू लागली आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील अचलेर गावातील शेतकरी कुटुंबात २८ जानेवारी १९९५ रोजी रजनीगंधा यांचा जन्म झाला. वडिलांच्या सरकारी नोकरीमुळे त्यांचे शिक्षण विविध ठिकाणी झाले. बी.ए.नंतर सामाजिक कायार्ची आवड जपत त्यांनी अंबाजोगाई येथील मानवलोक समाजकार्य महाविद्यालयातून एम.एस. डब्ल्यू.चे शिक्षण पूर्ण केले.

सामाजिक कायार्ची ओढ असल्याने त्यांनी सुरुवातीच्या काळात एचआयव्ही बाधित महिला आणि बालकांसाठी तीन वर्षे काम केले. अनेकांना मदत करत समाजाप्रती आपले ऋण फेडण्याचा प्रयत्न केला.



२८ जानेवारी २०२० रोजी त्यांचा विवाह संदीप गायकवाड यांच्याशी झाला आणि त्या सोलापूरच्या सुनबाई झाल्या. मात्र त्यांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता समाजकार्यात स्वतःला झोकून दिले. पती संदीप गायकवाड यांनीही त्यांच्या कायार्ला कायम प्रोत्साहन दिले.

सोलापूरमध्ये आल्यानंतर त्यांनी सामाजिक संस्थांमार्फत कामाला सुरुवात केली. त्यानंतर म. फुले समाज सेवा मंडळ, करमाळा येथे जिल्हा समन्वयक म्हणून काम करत बालविवाह, अल्पवयीन माता आणि बालकामगारांच्या प्रश्नांवर मोठे अभियान उभारले.

रजनीगंधा गायकवाड यांनी वीटभट्ट्या, हॉटेल, गॅरेज, वडापाव केंद्र, भाजी मार्केट, ऊसतोड कामगारांच्या वस्त्या अशा ठिकाणी जाऊन बालकामगारांविरोधात धडक मोहीम राबवली. अनेक मुलांना शाळेत परत पाठवले, महिलांना कुटुंबनियोजन, शिक्षण आणि स्वच्छतेबाबत समुपदेशन केले.

त्यांच्या या कार्यात सामाजिक कार्यकर्ते सौ. सुजाता कांबळे आणि वामन बावळे यांनीही सहकार्य केले.

आज "अल्पवयीन बालमाता" प्रकरण राज्यभर गाजत असताना, या प्रकरणामागील सत्य बाहेर आणण्यासाठी रजनीगंधा गायकवाड यांनी घेतलेली मेहनत चचेर्चा विषय ठरत आहे. सोलापूरच्या या सुनबाई आता केवळ सुनबाई राहिलेल्या नाहीत, तर समाजपरिवर्तनासाठी झटणाऱ्या 'स्मार्ट सुनबाई' म्हणून ओळख निर्माण करत आहेत.